## कार्यकर्ता : मुस्लिम महिलांच्या प्रबोधनासाठी

### रुबिना पटेल

मुस्लिम धर्मीयांत आढळून येणारा शरियतचा कायदा, बुरखापद्धती आणि बहुपत्नीत्व प्रथा या सर्व कारणांमुळे प्रत्येक तीन मुस्लिम घरांमागे एका घरातील महिला पीडित आहे. ही परिस्थिती निश्चितच फार गंभीर आहे. खऱ्या अर्थाने आज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जर सर्वांत जास्त गरज कोणाला असेल, तर ती दलित पीडितांपेक्षाही मुस्लिम महिलांना आहे. नऊ वर्षांपासून शरियतच्या कायद्यामध्ये बदल व्हावा, यासाठी अनेक आंदोलने केली. विविध चळवळींच्या माध्यमातून अद्याप आमचे प्रयत्न सुरू आहेत आणि ते सुरूच राहणार. आमच्या या कार्याला अनेकांचा विरोध आहेच. विरोधक सतत वेगवेगळ्या पद्धतींनी आम्हाला त्रास देण्याचा प्रयत्न करतात. पण दरवेळी मी डॉ.बाबासाहेबांना आठवते.



**रुबिना पटेल,** नागपूर
Mob. 9923162337


Date of Publication - 13-01-2018

# जात-धर्माची बेडी तोडून टाकायची आहे !

धर्म कोणताही असो- त्याच्या आड जेव्हा कोणाच्या मौलिक अधिकारांचे हनन किंवा शोषण केले जाते, तेव्हा त्याचा परिणाम समाजासाठी नेहमी घातक सिद्ध होऊ शकतो. अशाच धर्म आणि पुरुषी अहंकाराची शिकार झालेल्या नागपूरच्या ४४ वर्षीय रुबिना पटेल यांनी धर्माच्या सर्व बेड्यांमधून स्वतंत्र होऊन माणुसकीचा मार्ग निवडला आणि स्वत:सारख्या पीडित महिलांसाठी त्या आधारवड बनल्या; पण हा आधारवड होण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास मात्र किती बिकट होता याचा आपण विचारही करू शकत नाही.

आज रुबिना पटेल अख्ख्या महाराष्ट्राला परिचित आहेत त्या मुस्लिम महिलांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या लढवय्या कार्यकर्त्या म्हणून. मुस्लिम महिला मंचच्या संस्थापक म्हणून. रुबी ट्रेनिंग इन्स्टिट्यूटच्या डायरेक्टर म्हणून. अनेक ड्रॉपआऊट मुलींना १० वी चे शिक्षण घेण्यास मदत करणाऱ्या म्हणून. अनेक तलाकपीडितांची आधारवड म्हणून.

**प्रश्न –** रुबिना, तुझं बालपण कसं गेलं? तुझी जडण-घडण कशी घडली? नेमकं कुणाचं सहकार्य लाभलं तुला, तुझ्या डोळे दिपवून टाकणाऱ्या कार्याला? कारण गेल्या आठ-दहा वर्षांपासूनच आम्ही तुला या सोशल ॲक्टिव्हिटीमध्ये बघतो आहोत; कमी काळात तू खूप काम केल्याचं दिसतं आहे.

– माझं बालपण फारच बिकट गेलं. कुणाच्याही वाट्याला असं बालपण येऊ नये. मी नागपूरजवळच्या उमरेड तालुक्यातील. खरं तर आम्ही पटेल लोक एकदम सधन, पण माझे वडील खूपच दारू प्यायचे. दारूमध्ये त्यांनी आमची पूर्ण इस्टेट उधळली. त्यांच्यावरही देशी दारू पिण्याची वेळ आली आणि आम्ही- मी, माझा भाऊ आणि माझी आई आम्ही- एक वेळच्या जेवणालासुद्धा मोताद झालो. माझ्या आईवर मोलमजुरी करून पोट भरण्याची वेळ आली. माझे वडील स्वभावाने इतके दुष्ट होते की, ज्या दिवशी माझी आई पोटभर जेवण बनवू शकत होती त्या दिवशी ते त्यांचं जेवण झालं की गंजात पाणी टाकून ठेवायचे किंवा राक्षसासारखे स्वत:च सगळं फस्त करायचे किंवा फेकून द्यायचे. आमच्यावर पाणी पिऊन झोपण्याची वेळ यायची. मारपीट तर आमच्या पाचवीलाच पूजलेली होती. रात्री झोपेतून केस पकडून, लाथा मारून उठवायचे. बऱ्याचदा थंडीत, पावसात घराबाहेर हाकलून द्यायचे. नातेवाइकांकडूनही आमची अवहेलना सतत होत होती. मी आणि माझा लहान भाऊ त्यांनी सांगितलेली सगळी कामं मुकाट ऐकायचो, तरीही ते लोक आम्हाला मारपीट करायचे. त्यामुळे मी 'रम्य ते बालपण' वगैरेसारख्या गोष्टी फक्त पुस्तकातच वाचल्या आहेत.

यात एकच जमेची बाजू होती, तीच मला जगण्यास प्रेरणा देत होती. ती म्हणजे, मला लहानपणापासून शिक्षणाची खूपच आवड होती. प्रत्येक गोष्टीबद्दल मला जिज्ञासा असायची. हुशार होते मी. तेव्हासुद्धा माझ्या मनात सारखं हे असायचं की- आमच्यासारख्या गरीब पण होतकरू, हुशार मुलांच्या शिक्षणासाठी सरकारनेच काही तरी करायला हवे किंवा आम्हाला लवकरात लवकर कौशल्यविकासाचं काही तरी ट्रेनिंग द्यायला हवं; जेणेकरून आम्ही लौकर आमच्या पायावर उभे राहू शकू. कारण मला तर एक-एक दिवस कठीण होता. कधी मी शिकते, मोठी होते आणि माझ्या पायावर उभी राहते, असं मला झालं होतं; पण दुर्दैव माझा पिच्छा सोडत नव्हतं.

मी बारावी झाले आणि अचानक ध्यानी-मनी नसताना माझ्या वडिलांनी माझा निकाह एका मास्तरसोबत लावून

दिला. खरं तर मला एवढ्या लवकर लग्नच नव्हतं करायचं; पण वडिलांसमोर बोलण्याची सोयच नव्हती. त्यातल्या त्यात मला या गोष्टीचं समाधान होतं की, माझा निकाह एका शिक्षकाशी होतो आहे. मला वाटलं की, माझा होणारा नवरा जर शिक्षक आहे तर तो मला खूप छान नक्कीच शिकू देईल. लग्नानंतर लगेच माझ्या लक्षात आलं की, छळ माझ्या पाचवीलाच पूजलेला आहे. फरक एवढाच होता की, लग्नाआधी जन्मदाता मला छळत होता आणि आता ज्याच्यासोबत जन्मभर आनंदानं संसार करेन, असे स्वप्न उराशी बाळगून ज्याच्या भरवशावर मी या घरात पाऊल टाकलं होतं, तोच माझ्या जीवावर उठला होता. त्याने मला माझ्या आग्रहास्तव शिकू दिले, कारण त्यामुळे त्याला समाजात पुढारलेल्या विचारांचा शौहर म्हणून मान्यता मिळत होती; पण घरात मात्र त्याची मारझोड नित्याचीच होती. मला राहायला छान घर, कपडेलत्ते, खायला भरपूर हे सारं होतं; पण शारीरिक, मानसिक, लैंगिक छळ मात्र खूप होता.

अशातच मुलगा झाला. त्याही परिस्थितीत हट्ट करून मी बी.ए. प्रथम वर्षाची परीक्षा दिलीच आणि त्यात मी पासही झाले. त्यामुळे माझ्या स्वत:बद्दलच्या अपेक्षा आणखीच वाढल्या. मला उंच आकाशात उडायचे होते; पण नवरा माझे पंख कापायला सतत टपलेलाच असायचा. एक दिवस घरात खूप भांडण झाले. त्याने मला इतके मारले की, मी जवळजवळ मृतावस्थेतच रात्रभर पडून राहिले. पण जाऊ कुठे? मला माहेर तर नव्हतेच. माझ्या आईच्या हातात काहीच नव्हतं. नातेवाईक, समाज माझे हितचिंतक कधीच नव्हते. मी मनाशी काही तरी निर्धार केला आणि जशी मला संधी मिळाली, तशी १९९४ मध्ये मी माझ्या ११ महिन्यांच्या मुलाला घेऊन घर सोडलं आणि बडवानीजवळ कसरावादला तेव्हा बाबा आमटे राहायचे, त्यांच्यापर्यंत पोचले. मला त्यांच्यासोबत राहून समाजसेवा करायची होती. साधनाताई आणि बाबा आमटेंना माझी सगळी कर्मकहाणी सांगितली. त्यांनी मला सहानुभूती दाखविली. माझी सांत्वना केली. पण माझ्या नकळत माझ्या नवऱ्याला टेलिग्राम पाठवून बोलावून घेतलं, त्याला पुन्हा असं न वागण्याची समज दिली आणि मला त्याच्यासोबत जायला सांगितलं.

तिथेच सगळं चुकलं. तेव्हा जर मला बाबा आमटेंनी समजून घेतलं असतं, आधार दिला असता, माझ्या नवऱ्यावर विश्वास टाकला नसता; तर पुढे मला जो भयंकर मन:स्ताप झाला, तो झाला नसता. माझ्या संसाराला १२ वर्षं झाल्यानंतर पुढे त्यानं माझी इच्छा नसताना मला तलाक दिला. स्वत: दुसरे लग्नही केले. ते लग्न थांबवायला पोलिसांना मदत मागितली, तर त्यांनी मला मदत केली नाही. उलट पोलिसांनी मलाच 'गप्प बसा, नाही तर तुमच्यावरच गुन्हा दाखल करू' म्हणून धमकी दिली. नवऱ्यानेच माझ्यावर खोट्या केसेस दाखल केल्या. अन्याय माझ्यावर होत होता; पण सर्व लोक त्याच्याच बाजूने होते. माझा मुलगाही मला मिळाला नाही. मुलगी मात्र मला दिली, कारण त्याला मुलीची जबाबदारी घ्यायची नव्हती. त्याच्यासोबत भांडत असताना त्याने मला विहिरीत ढकलले. त्यातून मी कशीबशी वाचले, तर आत्महत्येचा प्रयत्न केला म्हणून त्याने माझ्याविरुद्ध पोलिसांत तक्रार केली. माझ्यावर कोर्टात केस चालू झाली. मी निर्दोष आहे, असं त्यांना रडून-भेकून सांगत होते; पण न्यायाधीश मॅडमही 'हिलाच अटक करा' म्हणून माझ्यावर ओरडल्या. वकील करायला माझ्याजवळ पैसा नव्हता. कायद्याचे मला ज्ञान नव्हते. त्यामुळे मी केस हरले; पण तिथून पुढे मी कायद्याचा बारकाईने अभ्यास केला. बी.एस.डब्ल्यू., एम.एस.डब्ल्यू केले. हिमतीनं उभी राहिले आणि जी काय आहे ती आज मी तुमच्यासमोर उभी आहे.

**प्रश्न –** कोर्टात तुम्ही 'मुस्लिम पर्सनल लॉ'ला चॅलेंज केलं, ते खरं आहे काय?

– मी 'मुस्लिम पर्सनल लॉ'ला चॅलेंज केलं नाही. माझ्यावर जो अन्याय झाला होता, त्यासाठी मी कोर्टात न्याय मागितला. सामाजिक चाली-रीती आणि पुरुषी मानसिकतेविरोधात मी उभी राहिले. 'मुस्लिम पर्सनल लॉ'नुसार खरं तर निकाहच्या वेळी मुलीची संमती घेण्याचा नियम आहे. 'कुबूल है?' असं मुलीलाही विचारलं जातं. मुलीच्या सुरक्षिततेसाठी पतीकडून मेहेर देण्याची पद्धत आहे. परंतु धर्माचा पुरुषांच्या बाजूने त्यांच्या फायद्यासाठी धर्मगुरुंद्वारे चुकीचा अर्थ सांगण्यात येतो. 'मुस्लिम पर्सनल लॉ'च्या तरतुदीचा अभ्यास मीही माझ्या केससाठी केला होता. त्यामुळे माझ्या ते लक्षात आलं. अर्थात पुरुषांनी सगळे नियम-कायदे आपल्या हितासाठीच बनवले आहेत, असं दिसून येतं.

मुस्लिम पर्सनल लॉ (शरियत कायदा) हा सांविधानिक कायदा नाही, तो कस्टमरी लॉ आहे. याचा अर्थ धार्मिक रीती-रिवाजाने आलेले नियम, प्रथा आहे ते मानणं

बंधनकारक नाही. अनेक वेळा मुस्लिम पुरुष शरियत कायद्याचा आधार घेऊन स्त्रियांवर अन्याय करतात. चार लग्नांचा अधिकार आहे असे समजून वाटेल तेव्हा पत्नीला तलाक दिला जातो. खरं तर अनेक इस्लामी देशांमध्ये शरियत कायद्यात सुधारणा झाल्या आहेत. आपल्याही देशात अशा सुधारणा होणे ही काळाची गरज आहे.

माझ्या केसमध्ये मी अशी बाजू मांडली की, मला हा तलाक मान्य नाही. शरीयत अदालतीमधील मुफ्तींनी जो तलाकचा फतवा बनविला, तो कायद्यास धरून नाही. माझ्या आयुष्याचा निर्णय घेण्याचा मुफ्तींना कसा अधिकार आहे? त्यांना हा अधिकार कुणी दिला? अनेक वेळा व्यक्तीला जिवानिशी मारण्याचाही फतवा दिला जातो. मोबाईलवर, एसएमएसद्वारे, इंटरनेटद्वारेही तलाक दिला जातो. परंतु संविधानाच्या अनुच्छेद १४ मध्ये प्रत्येक व्यक्तीला समानतेचा मूलभूत अधिकार आहे; तर १५ नुसार सरकार कुठल्याही धर्म, जाती, लिंग, वयाच्या आधारे भेदभाव करू शकत नाही. असे असताना माझ्याबाबत हा सांविधानिक भेदभाव का? तलाक मान्य करणे माझ्या सांविधानिक अधिकाराचे हनन नाही का? मी माझे मुद्दे मांडत असताना वकील लोक माझी बाजू कौतुकाने ऐकत होते. कौटुंबिक न्यायालयातील जज मॅडम मला म्हणाल्या, ''तुम्हारी बात सही है. तुम तुम्हारे जैसे लडकियोंके लिये काम करो. लेकिन पहले एलएल.बी करो.'' मी त्यांना सांगितलं, मी आजही माझ्यासारख्याच अनेक स्त्रियांसाठी लढतेच आहे. शहाबानोनंतर आजही मुस्लिम महिलांच्या पोटगीचा प्रश्न सुटलेला नाही.

**प्रश्न –** तुमच्यावर कुणाचा प्रभाव आहे?

– ज्यांच्यामुळे आम्ही तमाम स्त्रीवर्ग आज इथवर पोचलो, आम्हाला शिक्षणाचा अधिकार मिळाला ते महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा माझ्या आयुष्यावर खूप प्रभाव आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमध्येच मुस्लिम महिलांचे स्वातंत्र्य आणि मुक्तीचा विचार समाविष्ट आहे. संविधानामधील १४४ कलम हे स्त्री–पुरुष समानता समस्त भारतीय नागरिकांना प्रदान करते. मात्र मुस्लिम धर्मीयांत आढळून येणारा शरियतचा कायदा, बुरखापद्धती आणि बहुपत्नीत्व प्रथा या सर्व कारणांमुळे प्रत्येक तीन मुस्लिम घरांमागे एका घरातील महिला पीडित आहे. ही परिस्थिती निश्चितच फार गंभीर आहे. खऱ्या अर्थाने आज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जर सर्वांत जास्त गरज कोणाला असेल, तर ती दलित पीडितांपेक्षाही मुस्लिम महिलांना आहे.

नऊ वर्षांपासून शरियतच्या कायद्यामध्ये बदल व्हावा, यासाठी मी अनेक आंदोलने केली. विविध चळवळींच्या माध्यमातून अद्याप आमचे प्रयत्न सुरू आहेत आणि ते सुरूच राहणार. आमच्या या कार्याला अनेकांचा विरोध आहेच. विरोधक सतत वेगवेगळ्या पद्धतींनी आम्हाला त्रास देण्याचा प्रयत्न करतात. त्या प्रयत्नात त्यांची मजल माझ्यावर खुनी हल्ला करण्यापर्यंत गेली. पण दरवेळी मी डॉ.बाबासाहेबांना आठवते. आम्ही २५ डिसेंबरनंतरचा संपूर्ण पंधरवडा स्त्रीमुक्तिदिन म्हणून साजरा करतो. 'तू शिल्पकार हो तुझ्या भवितव्याचा, घे लाभ करूनी यास्तव या दिव्यतेचा,' या डॉ.आंबेडकरांच्या संदेशाला मी माझ्या हृदयावर कोरून ठेवले आहे.

माझ्यासाठी दुसरा आदर्श किंवा माझी प्रेरणा माझी आई आहे. माझ्या आयुष्यातल्या प्रत्येक क्षणात ती माझ्या पाठीशी आहे. माझ्या संघर्षात मला तिची साथ आहे. ती माझ्या सोबत आहे, म्हणूनच मी या दुनियेशी लढण्याची हिंमत करू शकले.

**प्रश्न –** मुस्लिम समाजात अल्पवयीन मुलींचे विवाह होण्याची कारणं काय आहेत? ते रोखण्यासाठी कायदे सक्षम नाहीत काय?

– 'मुस्लिम पर्सनल लॉ'मुळे मुस्लिम समाजात अल्पवयीन मुलींचे विवाह वाढत आहेत. भारतीय घटना अमलात आल्यानंतर कुठलाही लॉ अस्तित्वात नसले पाहिजेत. तथापि, 'मुस्लिम पर्सनल लॉ'च्या नावाखाली




Date of Publication - 13-01-2018

मौलानांकडून जाचक फतवे काढले जाताहेत. आपले अथवा आपल्या समाजातील व्यक्तींचे भले कशात आहे, याचा विसर पडल्याने हे होत आहे. परिणामी, समाजातील बालविवाहांचे प्रमाण वाढते आहे. त्याला अशिक्षित-पणाही कारणीभूत आहे. कुराणामध्ये महिलांना सन्मान आहे, चांगले अधिकार आहेत. मात्र त्याबाबत पुरुष मंडळी आग्रही नाहीत, उलट महिलांचे शोषण कसे होईल याचाच विचार केला जातो.

अल्पवयीन मुलींचे विवाह रोखण्यासाठी कायदे सक्षम असले तरी त्यांची अंमलबजावणी कशी होते, यावर बरेचसे अवलंबून आहे. एखाद्या ठिकाणी अल्पवयीन मुलीचा विवाह होत असल्यास पोलीसही कागदपत्रांची मागणी करतात. आश्चर्याची बाब म्हणजे, अनेकदा हे विवाह उन्हाळ्यात होतात. हा काळ सुट्टीचा असतो. त्यामुळे शाळांमधून कागदपत्रे मिळणे अशक्य असते. आईने जी आपल्या मुलीची जन्मतारीख सांगितली, तीच सत्य मानावी.

**प्रश्न –** मुस्लिम महिलांच्या नेमक्या समस्या कोणत्या आहेत?

– महिलांचा आदर करावा, असे मुस्लिम धर्मात सांगितले आहे. मात्र तसे होत नाही. शरियतमधील (धर्म) काही नियम या महिलांवर लादले जातात. बुरखा पद्धत व पर्सनल लॉ अर्थात चार लग्नांची प्रथा हे ते प्रमुख नियम म्हणता येतील. या धर्मातील पुरुषांना चार विवाह करता येतात. पत्नी नकोशी झाली की, तीनदा तलाक म्हणून काडीमोड होतो. अशा वेळी ही अज्ञानी महिला एकटी पडते. हे प्रमाण खूप आहे.

या पर्सनल लॉला संविधानाची मान्यता नाही. तीनदा तलाकलाही सर्वोच्च न्यायालयाची परवानगी नाही. केवळ शरियतचा आधार त्यासाठी घेतला जातो. शासनाचेही या बाबीकडे दुर्लक्ष आहे. त्यासाठीच आम्ही समुपदेशन केंद्र चालवतो. पण आम्ही केवळ महिलांच्याच बाजूने बोलतो, त्यांना भडकवतो, अशा खोट्या भ्रमाने लोकांचा आमच्यावर खूप रोष होता. पण आम्ही कुटुंब तोडण्याचे नाही, जोडण्याचेच काम करत असल्याचे कालांतराने कळल्यानंतर अनेक सुजाणांनी आमच्या कार्याची प्रशंसाही केली. मात्र आजही काही परंपरावादी लोकांच्या रोषास आम्हाला बळी पडावे लागते.

पवित्र कुराणमध्ये एक आयत आहे-

मर्दोसे कहो नजरे निची रखे,
औरतोंसे कहो चादरे खिचे!

'स्त्रियांचा सन्मान करा' असा अर्थ असलेल्या या आयतीतील 'तिने बुरखा घ्यावा' एवढाच अर्थ पुरुषप्रधान व्यवस्था लक्षात घेते. अशाच अनेक चांगल्या गोष्टींचा विपर्यास करून स्त्रीची गळचेपी करण्याचे प्रघात पाडून ठेवले आहेत. शहरी भागात तरी आता बरीच प्रगती झालेली आहे, पण ग्रामीण भागात मात्र अजूनही विदारक चित्र दिसत आहे. आज महाराष्ट्रात मुस्लिमांची लोकसंख्या सुमारे १ कोटी ५० लाखांच्या जवळपास आहे. त्यात शिक्षित पुरुषांची संख्या ५० लाखांच्या वर तर स्त्रियांची संख्या ३५ लाखांच्या वर आहे. याचाच अर्थ आणखी शिक्षणाची गरज आहे.

**प्रश्न –** तुमचे भविष्यातील संकल्प काय आहेत?

– बरंच काम अजून करायचं आहे. स्त्रियांसाठी मी काम करतेच आहे. दारात गरजू स्त्रिया रोज असतातच. लखनौची सायरा शेख हिला तिच्या नवऱ्याने चाकू मारून रेल्वेतून बाहेर फेकून दिले होते. तिची नागपूरला आम्ही देखभाल करून तिला तिच्या पायावर उभे केले आहे. अशा खूप सायरा शेख समाजात आहेत. त्यांच्यासाठी वसतिगृह काढायचे आहे. तलाकमुळे एकाही मुलीचे आयुष्य बर्बाद होऊ नये, असे मला वाटते.

आज मी वस्ती-वस्तीमध्ये जाऊन जे समुपदेशन करते, रुबी सोशल वेलफेअर, रुबी सोशल इन्स्टिट्यूटमधून मुलींना वेगवेगळं शिक्षण देऊन त्यांना प्रशिक्षित करण्याचा, त्यांच्या पायावर त्यांना उभं करण्याचा प्रयत्न करते; ते काम मला आणखी खूप वाढवायचं आहे. आपल्या देशातला प्रत्येक जातीचा माणूस जातीच्या जाणिवेनं झपाटलेला आहे. व्यक्ती माणूस म्हणून जन्माला येतो, जात किंवा धर्म म्हणून नाही. जात आणि धर्म माणसाला नंतर चिकटतो. ही जाती-धर्माची बेडी मला तोडून टाकायची आहे.

**प्रश्न –** रुबिना, तू संस्था स्थापन केली, मुलींच्या तलाकसाठी काम करते वगैरे आम्ही ऐकत असतो; पण तुझ्या कामाचं नेमकं स्वरूप काय आहे? आणि मागच्या वर्षी तू मुलींचा पतंगीचा खेळ किंवा सायकल रेस असे काही उपक्रम राबवलेस, त्यामागची तुझी नेमकी भूमिका काय होती?

– २००५ मध्ये मास्टर इन सोशल वर्कर्सच्या शिक्षणादरम्यान, मी माझ्या सोसायटीतील गरीब व

गरजवंत महिलांचे काऊन्सिलिंग करायला सुरुवात केली आणि किरायाच्या खोलीत रुबी सोशल वेल्फेअर सोसायटीची स्थापना केली. या संस्थेअंतर्गत अनेक प्रोजेक्ट्सवर काम केले जाते. यामध्ये सर्व धर्म व समाजाच्या महिलांसाठी काऊन्सिलिंग सेंटर आणि ट्रेनिंग इन्स्टिट्यूट आहे. ग्राफिकींग, कॉम्प्युटर, फॅशन डिझायनिंग, इंग्लिश स्पिकींगचा कोर्स करविला जातो. आम्ही सोशल अवेअरनेस प्रोग्रामही घेतो. याच संस्थेअंतर्गत मुस्लिम महिला मंच असाही एक फोरम आहे, ज्याच्या अंतर्गत ट्रिपल तलाक, बहुविवाह, फतव्याचा विरोध आणि मेंटेनन्स, महिलांच्या संपत्तीच्या अधिकारासाठी लढले जाते. हा फोरम केवळ मुस्लिम महिलांसाठीच काम करतो.

मुलींना शिक्षणाबाबत जागरूक करण्याबरोबरच असहाय आणि ड्रॉप मुलींना शाळेत पाठविले जाते. रोजगारासाठी प्रोफेशनल ट्रेनिंग दिले जाते. बेघर झालेल्या स्त्रियांच्या राहण्याची, त्यांच्या रोजगाराची आणि त्यांना मानसिक आधार देण्याचे काम आमची संस्था करते. कुही, उमरेड, पवनी अशा ग्रामीण भागातही आमचे काम चालते. तलाकसंबंधित मुद्यांवर मुस्लिम महिलांना लीगल काऊन्सिलींग केले जाते. अनेक महिलांना मेंटेनन्स मिळवून देण्यात आला आहे.

पतंग किंवा सायकल रेसबद्दल तुम्ही बोललात. मॅडम, आमच्या मुस्लिम स्त्रिया किती दिवस 'गुंगी गुडिया की तरह' राहतील? माझ्या मैत्रिणींनीसुद्धा 'हम भी किसिसे कम नहीं' म्हणत पतंगासारखं उंचच उंच उडायला हवं, हा विचार माझ्या मनात आला. मुस्लिम मुली आणि टेरेसवर पतंग उडवत आहेत, हे फक्त दिवास्वप्नच असू शकतं; पण मी ते सत्यात आणायचं ठरविलं. मला माझ्या मुली टेरेसवर ओरडताना, गोंधळ घालताना, चित्कारताना बघायचं होतं. हमारी लड़कियां ऐसा नही करती, वो सिर्फ बुरखेमेंही रहती, हे मला बंद करायचं होतं. ऐसा नही करती, म्हणजे कैसा नही करती? बुरख्यातच त्या सुखी आहेत? या पुरुषी विचारसरणीला, पितृसत्ताक धारणांना कुठेतरी शह द्यायलाच हवा होता.

आमच्या मुली स्वप्नही बघत नाहीत. कारण त्यांना ती ठाऊकच नाहीत. आम्ही त्यांना सक्षम करतो, स्वप्न दाखवतो. त्यांना स्वप्न दाखवणं हे आमचं कामच आहे असं आम्ही समजतो. ही स्वप्न त्यांच्या जाणिवा समृद्ध करायला मदत करतात. त्यांच्या भूतकाळातील जखमांवरील मलम ठरतात. जगण्याची नवी उमेद देतात. 'मै एक आझाद पतंग हूँ', असं म्हणत उडायला, बागडायला लावणं हीच त्या उपक्रमामागची माझी भूमिका. १५ जानेवारी २०१७ ला आमच्या टेरेस ५० च्या वर मुलींनी आणि लहान मुलांनी पतंगाचा खेळ बहरून आला. आमच्या टेरेसवर रंगीबेरंगी जिवंत मुली जणू पतंगच झाल्या होत्या. पतंग उडवले गेलेत, चक्री धरल्या गेली, आणि 'ओ काट'च्या गगनभेदी आवाजाने आमचा ताजबाग परिसर घुसळून निघाला. मुलींचं थुईथुई नाचणं, त्यांच्या डोळ्यांतला तो आनंद, त्यांचं मनमोकळं जोरात गडगडून हसणं बघून त्यांच्या आयांच्याही डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. मुली थकेपर्यंत पतंग उडवत राहिल्या. किती छोटी गोष्ट होती खरं तर ही. साधा पतंग उडवला त्यांनी; पण हा खेळ त्यांना एक नवा आत्मविश्वास देऊन गेला.

त्यानंतरच्या रविवारी म्हणजे २२ जानेवारीला आम्ही सायकल फेरी काढली. ताजबाग ते सक्करदरा. याही मागे माझा तोच उद्देश होता की आपण मुलांना सहज सायकल घेऊन देतो; पण मुलींना सायकल मिळतच नाही. तिची शाळा किंवा कॉलेज दूर असलं तरीही. याच्या उलट मुलं नापास झालेले असले, हुल्लडबाजी करत फिरत असले तरी त्यांच्या सेवेत मात्र सायकल असतेच. मला हा फरक मिटवायचा होता. सायकल आणि पतंग या दोन्हींशी आरोग्य आणि आत्मविश्वास जुळलेले आहेत. आमची सायकल फेरी खूप यशस्वी झाली. सायकली मुलींनीच गोळा करायच्या होत्या. त्यात त्या यशस्वी झाल्यात. भाऊ, वर्गमित्र, शेजारी कुणाकुणाकडून त्यांनी सायकली आणल्या आणि त्यांची रॅली निघाली. त्यांच्या जवळ फलक होते. त्यावर 'वुई वॉन्ट फिअरलेस लाइफ', 'लिंगभेदभाव नष्ट करा, हिंसा थांबवा', अशा घोषणाही त्या देत होत्या. त्या प्रत्येकीच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास झळकत होता.

मॅम, या दोन्ही उपक्रमातून मुलींना काय मिळालं? बेखौफ जगण्याची आस. आपण ठरवलं तर काहीही करू शकतो, हा स्वत:बद्दलचा विश्वास आणि स्वप्न पहायची असतात, ही समज. माझा प्रयोग यशस्वी झाला. हे मी नाही, माझ्या मुली म्हणतात.

संवादक : अरुणा सबाने
Mob. 9970095562